**<u>ठळक बातम्या</u>**

- भारताच्या संरक्षण निर्यातीत तब्बल ६० टक्के वाढ झाल्याचं संरक्षणमंत्र्यांचं प्रतिपादन

- सीजेपीच्या दिल्लीतल्या आंदोलनाला पोलिसांनी परवानगी नाकारली, नवी दिल्लीत पोहोचणाऱ्या बहुतांश रेल्वे गाड्याही रद्द / या गाड्या आणि मेट्रो स्थानकं पूर्ण बंद करू नयेत, असे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये ८७९ अंकांची वाढ

**आणि**

- भारतीय वंशाच्या नवेनेथम नवी पिल्लई यांना यंदाचा शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर

<><><><><>

भारताच्या संरक्षण साधनांच्या निर्यातीत गेल्या वर्षीच्या तुलनेत तब्बल ६० टक्के वाढ झाल्याची माहिती संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी आज दिली. नवी दिल्ली इथं झालेल्या सोसायटी ऑफ इंडियन डिफेन्स मॅन्युफॅक्चरर्सच्या 'चॅम्पियन्स अवॉर्ड्स' सोहळ्यात ते बोलत होते. २०२५-२६ या आर्थिक वर्षात भारताची संरक्षण निर्यात विक्रमी ३८ हजार ४२४ कोटी रुपयांवर पोहोचल्याचं त्यांनी सांगितलं. या विक्रमी निर्यातीत सार्वजनिक उपक्रमांचा वाटा ५५ टक्के तर खासगी क्षेत्रांचा वाटा ४५ टक्के होता. भारत अत्याधुनिक लष्करी उपकरणांचा विश्वासार्ह निर्यातदार म्हणून उदयास येत असल्याचं राजनाथ सिंह यांनी नमूद केलं.

सध्याच्या काळात राष्ट्रीय सुरक्षेची व्याख्या बदलली आहे. राष्ट्रीय सुरक्षा ही केवळ सशस्त्र दलांच्या आकारावर अवलंबून नसते तर ती संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेवरही अवलंबून असते, असं त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

दिल्लीत जंतरमंतर इथं उद्या होणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाला दिल्ली पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर नोएडा आणि दिल्लीला जोडणाऱ्या सीमांवर सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. उद्या पहाटे ४ ते दुपारी २ या वेळीत नवी दिल्ली आणि हजरत निजामुद्दिन स्थानकांवर पोहोचणाऱ्या सर्व मेल आणि

एक्सप्रेस गाड्या रद्द केल्या जातील, अशी माहिती रेल्वे मंत्रालयानं दिली आहे. सुरक्षेच्या कारणास्तव ५७ मेट्रो स्थानकंही आज रात्री नऊ वाजल्यापासून बंद राहतील असं दिल्ली मेट्रो कॉर्पोरेशननं कळवलं आहे.

मात्र दिल्लीला जाणाऱ्या ट्रेन पूर्णपणे थांबवू नयेत आणि मेट्रो स्थानकंही पूर्ण बंद करू नयेत, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकारला दिले आहेत. लोकांची गैरसोय होऊ नये, यासाठी या सेवा नियंत्रित पद्धतीनं सुरू ठेवाव्यात, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या पीठानं सांगितलं. यावर, हे संबंधित यंत्रणांपर्यंत पोहोचवू, असं सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितलं. याबाबत योग्य त्या आगाऊ सूचना नागरिकांना द्याव्यात, जेणेकरून त्यांना कोणताही त्रास होणार नाही, असंही न्यायालयानं स्पष्ट केलं.

जंतरमंतरच्या ४ किलोमीटर परिसरात आज रात्री १० ते उद्या रात्री १० वाजेपर्यंत इंटरनेट सेवा बंद ठेवण्याचा निर्णय दिल्ली पोलिसांनी घेतला आहे. या निर्णयाला केंद्रीय गृहमंत्रालयाची मंजुरी मिळाल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली. उर्वरित दिल्लीत मात्र इंटरनेट सेवा सुरळीत सुरू राहतील.

**<><><><><>**

महाराष्ट्रात, विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीत अर्ज मागं घ्यायच्या शेवटच्या दिवशी काही ठिकाणांहून प्रमुख उमेदवारांनी माघार घेतली असली तरी महायुती आणि महाविकास आघाडीतलं बंड पूर्णपणे शमलेलं नाही.

पुणे शिक्षक मतदारसंघातून शिवसेनेचे उमेदवार मंगेश चिवटे यांनी माघार घेतली. त्यामुळं भाजपाचे कौस्तुभ गावडे या मतदारसंघात महायुतीचे उमेदवार असतील हे स्पष्ट झालं. या मतदारसंघातून माजी आमदार दत्तात्रय सावंत, सचिन सानप यांच्यासह अनेक उमेदवारांचं आव्हान महायुतीसमोर आहे. महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे जयंत आसगावकर हे उमेदवार असल्यानं तिहेरी लढत आहे. पुणे शिक्षक मतदारसंघात ३० तर पुणे पदवीधर मतदारसंघात ४७ उमेदवार रिंगणात आहेत.

बड्या नेत्यांनी प्रयत्न करून सुद्धा नागपूर पदवीधर मतदारसंघात भाजपचे नेते अनिल सोले यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतलेला नाही. त्यामुळं भाजपाचे अधिकृत उमेदवार सुधाकर कोहळे यांच्यासमोर त्यांचं आव्हान कायम आहे. या मतदारसंघातून इतर १६ उमेदवारांनी

अर्ज मागं घेतल्यानं ३८ जण निवडणूक लढवतील. तर अमरावती शिक्षक मतदार संघातून ४ जणांनी अर्ज मागे घेतल्यानं २६ जण रिंगणात आहेत.

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघात एकूण १३ जणांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानं आता ४१ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. विधान परिषदेसाठी २३ ऑक्टोबरला मतदान होणार असून २७ ऑक्टोबरला मतमोजणी होईल.

<><><><><>

'पर्म' अर्थात परमनंट लेबर सर्टीफिकेशन कार्यक्रमाबाबत अमेरिकेनं जाहीर केलेलं धोरण दोन्ही देशांची सामायिक उद्दिष्टे साध्य करायला पूरक नाही, असं आज भारतानं स्पष्ट केलं. नवी दिल्ली इथं बातमीदारांशी बोलताना परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले की, सरकारनं काही कंपन्यांना 'पर्म' कार्यक्रमातून निलंबित केल्यामुळे, विद्यमान H-1B व्हिसाची वैधता किंवा व्हिसाधारक आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तींचा दर्जा यांवर कोणताही परिणाम होत नाही....

**- होल्ड - बाईट - रणधीर जयस्वाल - - -**

<><><><><>

दोन दिवस झालेल्या मोठ्या घसरणीनंतर आज देशातले शेअर बाजार तेजीत राहिले. माहिती तंत्रज्ञान कंपन्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याची आशा, अमेरिकेकडून इराणवर हल्ल्याची कमी झालेली शक्यता, कच्च्या तेलाच्या दरात झालेली घट, यासारख्या कारणांनी गुंतवणूकदारांनी खरेदीवर जोर दिला. त्यामुळे मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये दिवसअखेर ८७९ अंकांची वाढ झाली, आणि तो ७२ हजार ४७२ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २८९ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ५२० अंकांवर बंद झाला.

<><><><><>

यंदाचा शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार नवेनेथेम ‘नवी’ पिल्लई यांना जाहीर झाला आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याचं पालन आणि शांततेसाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांबद्दल त्यांना हा पुरस्कार दिल्याचं नॉर्वेच्या नो◌ेबेल समितीनं म्हटलं आहे. २००८ ते २०१४ या कालावधीत त्या संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार उच्चायुक्त म्हणून कार्यरत होत्या. गुलामगिरीच्या विरोधात उभे ठाकलेले नेल्सन मंडेला यांच्यासह इतरांचा न्यायालयात बचाव करणाऱ्या वकील, ते आंतरराष्ट्रीय कायदेशीर प्रकरणांमध्ये न्यायाधीश म्हणून त्यांनी दिलेल्या

योगदानासाठी त्यांना या पुरस्कारानं गौरवलं जाणार आहे. १२ लाख अमेरिकी डॉलर इतकी या पुरस्काराची रक्कम आहे.

दक्षिण आफ्रिकेत गुलामगिरीच्या काळात, भारतीय तमिळ कुटुंबात १९४१ मध्ये जन्मलेल्या नवी पिल्लई यांनी कायद्याचं शिक्षण घेतलं आणि व्यवस्थेत खोलवर गेलेल्या भेदभावावर त्यांनी प्रहार केला. हार्वर्ड विद्यापीठातून त्यांनी कायद्याच्या शिक्षणात पीएचडी केली आहे.

<><><><><>

यंदाचा ‘विष्णुदास भावे गौरवपदक’ पुरस्कार ज्येष्ठ अभिनेत्री, लेखक, दिग्दर्शक आणि नाट्य प्रशिक्षक सई परांजपे यांना जाहीर झाला आहे. सांगलीच्या अखिल महाराष्ट्र नाट्य विद्यामंदिर समितीकडून हा पुरस्कार दिला जातो. गौरवपदक, ३० हजार रुपये रोख, आणि स्मृतीचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

<><><><><>

राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी आज १०३ पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना शौर्य, असामान्य सेवा आणि उल्लेखनीय कामगिरीसाठी पोलीस पदकांनी सन्मानित केलं. लोकभवन इथं झालेल्या या कार्यक्रमात २ पोलीस अधिकारी आणि अंमलदारांना पोलीस शौर्य **पदकं**, १८ जणांना शौर्य पदकं, ३ अधिकाऱ्यांना राष्ट्रपती उल्लेखनीय सेवेचं पोलीस पदक, ४ अधिकारी आणि अंमलदारांना राष्ट्रपती गुणवत्तापूर्ण सेवेचं पदक, ४० अधिकारी आणि अंमलदारांना पोलीस पदक आणि ३६ जणांना गुणवत्तापूर्ण सेवेचं पदक प्रदान करण्यात आलं.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या दुष्काळ जाहीर न झालेल्या आणखी ३६ तालुक्यांचं सर्वेक्षण करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. त्यापैकी १८ तालुक्यांमध्ये २० टक्के ग्राउंड ट्रुथिंग, अर्थात प्रत्यक्ष शेतात जाऊन पडताळणी करायचा शासन आदेश सरकारनं आज जारी केला. या पाहणीनंतर त्यांचाही दुष्काळी यादीत समावेश करण्याबाबत विचार केला जाणार आहे.

पीक कर्जमाफीच्या लाभापासून ई-केवायसीअभावी वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी गावनिहाय याद्या तयार केल्या जाणार आहेत.

**<><><><><>**

अभिनेता नाना पाटेकर यांच्या मृत्युप्रकरणी गोव्यात पणजी पोलिसांनी अनैसर्गिक मृत्युची नोंद करून तपास सुरू केला आहे. नाना पाटेकर यांच्या जवळच्या नातेवाईकांचे जबाब नोंदवले जाणार आहेत.

//<><><><><>//